


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : २६४ वा | सोमवार | दि. २३ डिसेंबर २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजमुळे भ्रष्टाचाऱ्यांना उठला पोटशूळ

## भ्रष्ट अधिकारी व कंत्राटदारांकडून हल्ल्याची तयारी?

## भ्रष्टाचारा विरोधात आम्ही पत्रकारितेचा धर्म असाच पाळणार!

**वृत्तसंस्था जनसंचलन/बुलढाणा**

गेल्या अनेक वर्षांपासून दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने आपल्या वृत्तपत्रातील बातम्यांच्या माध्यमातून भ्रष्टाचाराचा भंडाफोड करणे व भ्रष्टाचाऱ्यांना जनतेसमोर उघडं-नागडं करण्याचे काम करीत आहे. या प्रकारामुळे भ्रष्ट अधिकारी व संचालकांमध्ये चांगलाच पोटशूळ उठला असून, असेच सुरू राहिल्यास आपल्यावर कारवाई निश्चित होईल, या भीतीने दैनिक जनसंचलनचा आवाज काहीही करून दाबायचा असा चंग बांधल्याचे दिसत आहे. सोशल मीडियावर यासंदर्भातील काही पोस्ट फिरत असून, प्रसंगी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनवर हल्ल्याचीही तयारी होत असल्याची खात्रिलायक माहिती प्राप्त झाली आहे. यासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या वतीने पोलिस विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही माहिती देण्यात आली आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून दैनिक जनसंचलन महसूल विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रधानमंत्री-मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, जिल्हा परिषद, सहकार विभाग व संबंधित कंत्राटदारासह अशा विविध विभागांमध्ये जो काही भ्रष्टाचार बोकाळला आहे, त्या विरोधात सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करून भ्रष्टाचाऱ्यांना जनतेसमोर उघडे पाडण्याचे काम करीत आहे. महसूल विभागात कार्यरत

**पोस्टमार्टम १२५**

असणारे मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराचा सगळा कच्चा-चिठ्ठा केवळ आणि केवळ सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनने जनतेसमोर ठेवला आहे. एव्हढेच नाही तर टेकाळे यांनी बेबंदपणे भ्रष्टाचार करून जी काही चल अचल अवैध संपत्ती जमा केली आहे, त्याचा तपशीलही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग तसेच महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सोपवला आहे. त्यासंदर्भात कारवाईला सुरवातही झालेली आहे. याशिवाय दैनिक जनसंचलनच्या वतीने अमरावती येथील जिजाऊ कमर्शियल सहकारी बँक असो की, जिल्हा सामान्य रुग्णालय. या सर्व ठिकाणी बोकाळलेल्या भ्रष्टाचाराची माहिती पुराव्यांनिशी प्रकाशित केली आहे. सर्वाधिक करोडो रुपयांचा भ्रष्टाचार हा जिल्हा सामान्य रुग्णालय आरोग्य विभागाचा आला आहे. जिल्हा रुग्णालयात झालेला भ्रष्टाचार हा करोडोंच्या घरात आहे. या ठिकाणी गेल्या अनेक वर्षांपासून भ्रष्टाचाराची एक अविरत मालिकाच सुरू आहे. परंतु म्हणावी तशी कारवाई अद्याप झालेली नाही. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज केवळ वृत्तमालिका प्रकाशित करून थांबत नाही, तर भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती पुराव्यांनिशी थेट मुंबईच्या मंत्रालयात बसलेल्या वरिष्ठ सचिव अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम करीत आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या पाठपुराव्यांमुळेच काही भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई देखील झाली आहे. भ्रष्ट अधिकाऱ्यांचे अगदी वरपर्यंत लागेबांधे असतात. अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांशी त्यांचे अर्थपूर्ण साटेलोटे असते, त्यामुळे भ्रष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई व्हायला बराच विलंब लागतो. परंतु शेवटी म्हणतात ना ङ्कङ्कसत्य परेशान हो सकता है लेकिन पराजित नहीं हो सकताङ्कङ्क. तशीच स्थिती आहे. कारवाई होते परंतु त्याला थोडा वेळ लागतो. परंतु दैनिक जनसंचलन काही केल्या आपली भ्रष्टाचारविरोधी मोहीम थांबवत नसतो. जिल्हा सामान्य रुग्णालयातील महाभ्रष्टाचारी भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांच्यावर कारवाईला सुरवात देखील झाली आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात मॉड्युलर ओटीचे कंत्राट घेणाऱ्या सोलापूर येथील बबलू इनामदार याने तर दैनिक जनसंचलनकडे स्वतः चे काही बरंवाईट करून घेण्याची धमकी दिली होती. परंतु या धमकीला न जुमानता दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या वतीने थेट बबलू इनामदार यांच्याविरोधातच पोलिसात तक्रार दिली आहे.दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज हे गेल्या अनेक वर्षांपासून भ्रष्टाचाऱ्यांचा कर्दनकाळ ठरलेले वृत्तपत्र




आहे. भ्रष्टाचाराबाबत झिरो टॉलरन्स अशी आमची नीती राहिलेली आहे. काहीही झाले तर आम्ही भ्रष्टाचार सहनच करू शकत नाही. भ्रष्टाचार बाहेर आणून शासकीय कामकाजात पारदर्शता आणणे हे कोणत्याही वृत्तपत्राचे आद्य कर्तव्य आहे. त्यामुळे आम्ही ते नेटाने करीत आहोत. त्यामुळे भ्रष्ट अधिकारी व कंत्राटदारांचे धाबे दणाणले आहे. त्यातूनच मग काही सोशल मीडियावरून सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनला धडा शिकवण्याची भाषा करणाऱ्या पोस्ट फिरत आहेत.भ्रष्ट अधिकारी व कंत्राटदारांना आम्ही सांगू इच्छितो की, दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज काही केल्या आपली भ्रष्टाचारविरोधातील मोहीम बंद करणार नाही. जोपर्यंत सर्व भ्रष्टाचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होत नाही आणि ते गज-ाआड जात नाही, तोपर्यंत ही मोहीम सुरूच राहणार आहे. त्यामुळे कोणी कितीही धमक्या दिल्या तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज आपले कर्तव्य निभावतच राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

## एसपींच्या नेतृत्वात सहा कोटी ९८ लाख ७३ हजार ३००२ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत!

**जनसंचलन/बुलढाणा**

अवघ्या तीन महिन्यापूर्वी पदभार स्वीकारताच१५ ऑक्टोंबर ते २० नोव्हेंबर पर्यंतआदर्श आचारसंहिता काळात जिल्हा पोलीस दलाने सहा कोटी ९८ लाख ७३ हजार ३००२ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पो.अ. विश्व पानसरे यांचे नेतृत्वात बुलढाणा पोलिसांची जिल्ह्यात धडक कार्यवाही करण्यात आली.त्यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली सर्व जिल्हातील सर्व पोलीस स्टेशन येथील हद्दीत हातभट्टीची दारु, अवैधदारु, अंमली पदार्थ, अवैध शस्त्र, नियमबाह्य कॅश या संबंधाने कार्यवाही करण्यात आली या करीता जिल्ह्यात विशेष नाकाबंदी, ऑपरेशन ऑल आऊट, सर्च ऑपरेशन या व इतर खबरदारीच्या प्रतिबंधक उपाययोजना वेळोवेळी राबविण्यात येवुन १५/१०/२०२४ पासून दि. २०/११/२०२४ या आदर्श आचार संहिता काळामध्ये बुलढाणा पोलीस दलाने एकूण सहा कोटी अठठ्यान्नव लाख त्र्याहत्तर हजार तीनशे दोन रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. सदर मुद्देमाल हा सन २०१४ विधानसभा मध्ये एक कोटी पासष्ट लाख चौपन्न हजार तीनशे अकरा रुपये, विधानसभा २०१९ साली चौरेचाळीस लाख अठ्ठावीस हजार पाच रुपये, तर लोकसभा सन २०१९ साली एकोणपन्नास लाख चार हजार आठशे अडोतीस रुपये, लोकसभा २०२४ साली सासष्ट लाख व्यान्नव हजार दोनश पंधरा रुपये होता. तर सन २०२४ विधानसभा मध्ये बुलढाणा पोलीस दलाने एकूण सहा कोटी अठ्ठ्यान्नव लाख त्र्याहत्तर हजार तीनशे दोन रुपयांचा मुद्देमाल हा सन २०१४, २०१९च्या लोकसभा-विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत अनेक पटींनी जास्त आहे.

# बुलढाणा पालिका निवडणुकीसाठी इच्छुकांच्या आतापासूनच हालचाली !

**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभा, विधानसभा निवडणूक झाल्यानंतर आता कार्यकर्त्यांची निवडणूक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद व पालिकांच्या निवडणुका लवकरच होण्याची आस राजकीय कार्यकर्ते ठेवून आहेत. त्यानुषंगाने पालिका निवडणुकीच्या दृष्टीने आतापासूनच काही इच्छुकांनी हालचाली सुरू केल्या आहेत. बुलढाणा पालिकेतंर्गतही अनेक इच्छुक सध्या तयारी लागले आहेत. त्यासाठी आपआपल्या प्रभागामध्ये संपर्क अभियान त्यांनी सुरू केले असून, मतदार याद्यामध्ये आपले नाव आहे का?, कोणाचे नाव त्यात समाविष्ठ करायचे का?, या दृष्टीने फोनद्वारे चौकशी करण्यास अनेकांकडून प्रारंभ झाला आहे. येत्या काळात शहरातील राजकीय वातावरण तापले, तर नवल वाटायला नको. वास्तविक राखीव जागांच्या मुद्द्यावर सध्या निवडणूक रखडलेली असून, प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे निवडणुकांचा मुहूर्त नेमका कधी लागतो हे तूर्तास सांगणे शक्य नसले, तरी मध्यंतरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या यासंदर्भातील वक्तव्यामुळे अनेकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. सोबतच महायुतीचे सरकार आल्याने न्यायालयात सरकारची भूमिका मांडून निवडणुकांचा मार्गही मोकळा होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात चर्चिली जात आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवू इच्छिणारे सध्या बुलढाण्यात सक्रीय झाल्याचे चित्र आहे.

# साखरखेर्डा येथे राबविले स्वच्छता अभियान....

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

ग्रामस्वच्छतेचा संदेश देणारे राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री शिवाजी व्यायामशाळा मित्र मंडळाच्या वतीने जय संताजी नगर परिसरामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सर्वप्रथम राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री शिवाजी व्यायामशाळेत त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संत गाडगे बाबा यांचे तत्त्व श्रद्धा व विज्ञानाला धरून होते. देव मानवात आहे, भुकेल्यांना खायला द्या, शिक्षण घ्या, अंधश्रद्धेला बळी पडू नका व मानवी आरोग्यासाठी स्वच्छता असणे गरजेचे आहे. त्यासाठी आपला गाव परिसर स्वच्छ ठेवा. असा महान मानवतावादी संदेश संत गाडगेबाबा यांनी जगताला दिला. त्यांचा स्वच्छतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचावा यासाठी गावात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सेवानिवृत्त मुख्याध्यापक अभिमन्यू इंगळे, पत्रकार गजानन इंगळे, नारायण पोधाडे, पंकज जैन, निलेश इंगळे, जगदीश इंगळे, गावातील इतर प्रतिष्ठित नागरिक या अभियानात सहभागी झाले होते

# सामाजिक जाणिवेचा आदर्श गजानन वाघ यांनी वाढदिवसानिमित्त मतिमंद विद्यालयात स्वेटर व भोजन वाटप

**जनसंचलन/बुलढाणा**

पाश्चात्य पद्धतींच्या प्रभावाखाली वाढदिवस साजरा करण्याच्या पारंपरिक पद्धतींना विसर पडतोय, मात्र अंभोडा येथील गजानन वाघ यांनी समाजाला एक वेगळा संदेश दिला आहे. वाघ यांनी आपला वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करत मतिमंद निवासी विद्यालय, म्हसला बु. येथील विद्यार्थ्यांसाठी स्वेटर व भोजन वाटप केले. गजानन वाघ यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, ङ्कङ्कस्वेटर घालताना या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर झळकलेले हास्य हे माझ्यासाठी खऱ्या आनंदाचा क्षण होता. हा दिवस माझ्या आयुष्यातील खऱ्या अर्थाने विशेष ठरला.फ्फ या कार्यक्रमाला मतिमंद निवासी विद्यालयाचे अध्यक्ष शिवनारायण पोपळकर, माँ जिजाऊ अर्बनचे उपाध्यक्ष शिवाजीराव तायडे यांसह




अनेक मान्यवर आणि स्थानिक नागरिकांची उपस्थिती होती. वाघ यांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या या संकल्पनेने समाजसेवेला नवा आयाम मिळाला आहे. अशा विधायक कृतींमुळे वाढदिवस साजरा करण्याची नवी सामाजिक आणि आदर्श परंपरा प्रस्थापित होत आहे.

# लेखी आश्वासनानंतर त्या उपोषणाची सांगता !

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

खडकपूर्णा प्रकल्पातील पाणी नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून परिसरातील धरणात पोहोचून ते पुन्हा खडकपूर्णा नदीत सोडण्यात येऊन परिसरातील शेती सिंचनाची सोय करावी, या मागणीसाठी कैलास नागरे यांनी शिवनी अरमाळ धरण परिसरात बेमुदत उपोषण सुरू केले होते. २० डिसेंबर रोजी प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. कैलास नागरे हे १५ डिसेंबरपासून उपोषणास बसले होते. त्यांच्या मागण्यांची दखल घेत जिल्हास्तरीय बैठक आयोजित करून या मुद्द्यावर चर्चा करून तोडगा काढण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाने त्यांना दिले. जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांशीही त्यानुषंगाने बैठक घेऊन चर्चा करण्यात येईल, असे सांगण्यात आले. २४ डिसेंबर रोजी ही बैठक होईल असे स्पष्ट करण्यात आल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले. अंढेरा येथील सरपंच रुपाली आंबीलकर यांच्या हस्ते सरबत घेऊन हे उपोषण २० डिसेंबर रोजी रात्री सोडण्यात आले. यावेळी एसडीओ प्रा. संजय खडसे, तहसीलदार वैशाली डोंगरजाळ, ठाणेदार विकास पाटील व परिसरातील नागरिक यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा, शिवनी अरमाळसह लगतच्या पट्ट्यात यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिले आहे. त्यामुळे या भागात यंदा आतापासूनच टंचाईची स्थिती रहाण्याची शक्यता आहे. खडकपूर्णाचे पाणी कालव्याद्वारे या भागात फिरवल्यास फायदा होईल असे नागरे यांचे म्हणणे होते.

# सिं. राजा येथील युवक गुप्तहेर विभागात अधिकारी !

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

शहरातील अमित खुशालराव खांडेभराड यांची मेहनत, सातत्याचा अभ्यास, देशसेवा करण्याची इच्छा या प्रयत्नातून केंद्रीय गुप्तहेर विभागात सहायक गुप्तचर अधिकारी म्हणून निवड झाली आहे. शेगावच्या नवोदय विद्यालयात शिक्षण घेऊन त्याने अमरावती येथे मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. काही वर्षे संभाजीनगर येथे एका कंपनीत मोठ्या हुद्द्यावर काम केले; परंतु मनातील देशसेवेची इच्छा त्याला शांत बसू देत नव्हती. त्यांनी नोकरी सोडून स्पर्धा परीक्षा देण्याचे ठरविले. कोणताही क्लास न लावता अभ्यास करून त्यांनी केंद्रीय स्पर्धा परीक्षेत यश मिळविले. ऑक्टोबर महिन्यात त्यांची मुंबई येथे मुलाखत झाली. १९ डिसेंबर रोजी निकाल लागला असून त्यामध्ये अमित सहायक केंद्रीय गुप्तचर अधिकारी म्हणून नियुक्त झाले. अमित खांडेभराड याला सुरुवातीपासूनच देशसेवा करण्याची इच्छा होती. त्यानुसार त्याने नियोजनाची सांगड घालीत यश प्राप्त केले आहे. त्यामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त संत गाडगेबाबांचे जीवनकार्य आणि दशसूत्री वर आधारित मार्गदर्शन व एकपात्री प्रयोग कार्यक्रम संपन्न.

जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक जिजामाता महाविद्यालय बुलढाणा येथे संत गाडगेबाबांचे जीवनकार्य आणि दशसूत्री या विषयावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुरेश गवई यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना () विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पांजली अर्पणाने झाली. या प्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ सुरेश गवई, डॉ. सुबोध चिंचोले ,प्रा .जे जे जाधव, डॉ ज्ञानोबा कांदे , डॉ नामदेव ढाले, प्रा पैकीने प्रा संजय सोनूने, प्रा डॉ संतोष कुंभारे,प्रा गणेश किरोचे मृणालिनी सपकाळ, डॉ राजश्री येवले, प्रा .माधुरी पुनसे तसेच प्राध्यापक वृंद व सर्व स्टाफ नी प्रतिमेला पुष्प अर्पण केले. त्यानंतर महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये संत गाडगेबाबांचे जीवनकार्य आणि दशसूत्री या विषयावर चर्चसत्राचे आयोजन केले होते प्रमुख वक्ते म्हणून डॉ.डि.जे कांदे अर्थशास्त्र विभागप्रमुख यांनी संत गाडगेबाबांच्या जीवनकार्यावर सविस्तर चर्चा केली. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर महाविद्यालयाचा विद्यार्थी आविष्कार इंगळे यांनी संत गाडगे बाबा यांच्या भूमिकेत एकपात्री प्रयोग सादर करून अंधश्रद्धा शिक्षण मानवी मूल्य अशा विविध विषयाला धरून उपस्थितांची दाद मिळविली. प्राचार्य डॉ सुरेश गवई यांनी आपल्या मनोगतात गाडगेबाबांच्या विचारसरणीचा आधुनिक समाजाच्या प्रगतीसाठी असलेला उपयोगी दृष्टिकोन मांडला. आय क्यू ए सी समन्वयक डॉ सुबोध चिंचोले यांनी संत गाडगेबाबांनी दिलेल्या स्वच्छता आणि विवेकशीलतेच्या संदेशाचे पालन करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन कु वैष्णवी कड हिने प्रास्ताविक. प्रा.गजानन लोहटे



रा.से. यो. कार्यक्रम अधिकारी यांनी तर आभार प्रदर्शन सहकार्यक्रम अधिकारी डॉ प्रदिप वाघ केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा.जी. पी देशमुख, डॉ आनंद मोरे डॉ आनंद देशपांडे, डॉ विकास पहूरकर, प्रा पवन ठाकरे, प्रा .साळवे, प्रा संभाजी माने, प्रा वैशाली मोरे, प्रणिता पाटील श्री विनोद आराख, श्री रंगारी, श्री जी पी भोंगे श्री वामन पवार, रणवीर चंदनसे, युवराज डुकरे तसेच भगवान भाऊ उबाळे अशोक भाऊ जाधव, श्रीमती भोंडेबाई शेख आर्षद. इत्यादींचे कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये सहकार्य लाभले. या प्रसंगी महाविद्यालयातील र. से यो तसेच इतर सर्व शाखांतील विद्यार्थी उपस्थित होते.

## धनुष्याचं निशाण लाडकं! एक वर्षाची चीमुकली कट्टर शिवसैनिक!

## चिमुकल्या भक्तीची राजकीयभक्ती!

जनसंचलन/बुलढाणा

चॉकलेट साठी बालहट्ट धरताना आपण लहान मुलांना पाहिलं असेल ! पण चिखली रोडवरील संत गाडगेबाबा नगरात भक्ती नामक एका वर्षाच्या मुलीने चक्क राजकीय हट्ट धरलाय! तिची भक्ती राजकीय आहे किंवा काही हे माहीत नाही, परंतु ती रोज शिवसेनेच्या धनुष्यबाणाचा असलेला बिल्ला ड्रेसवर लावून मागतेय.कोणत्याही पक्षाशी संबंध नसलेल्या आई बाबांना हा हट्ट पुरवावा लागतोच! हा चिमुकलीचा बालहट्ट दररोजचा आहे.त्यामुळे एक वर्षाची चीमुकली कट्टर शिवसैनिक असा तिचा आता नावलौकिक होत आहे. बुलढाणा जिल्ह्याचे आमदार संजय गायकवाड हे काठावर पास झाली असली तरी त्यांचा,नावलौकिक कायम आहे.त्यांनी विधानसभा निवडणुकीचे पूर्वी वाटलेले धनुष्यबाणाचे बिल्ले घरोघरी पोचले होते.हाच एक बिल्ला चिखली रोड वरील भक्ती नावाच्या एका एका वर्षाच्या मुलीच्या हाती लागला.मग काय



भक्ती दररोज हा बिल्ला खेळणे म्हणून खेळायची!कुणी हात लावला तर,आग पाखड करायची!तिला अनेकांनी विचारले होते..कोण निवडून येणार?ती केवळ तिच्या भाषेत धनुष्यबाण दाखवत होती!कारण या धनुष्यबाणाशी तिचे वेगळेच नाते जुळले होते की काय?हे कोणालाही समजले नाही.निवडणूक पार पडली संजय गायकवाड निवडून आले.तरीही भक्तीची धनुष्यबाणावरील भक्ती अजून कायम आहे!

## नाताळ सणाची तयारी अंतिम टप्प्यात !




जनसंचलन/ खामगाव

मानवता धर्माचा उपासक असलेल्या प्रभू येशूचा जन्मदिन अर्थात नाताळ सण अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपला आहे. यामुळे खामगावात या सणाच्या पूर्वतयारीला वेग आला आहे. नाताळ सणाचे आनंदाने स्वागत करण्यासाठी खामगावात सध्या प्रभू येशूच्या जन्माचे देखावे अर्थात नाताळ गोठे साकारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. तसेच खामगाव येथील बेथेल अलायन्स या चर्चसह सर्वच चर्चवर आकर्षक विद्युत रोषणाई आणि सजावटीचे काम सुरू आहे. पुढील आठवड्यात २५ ते ३० डिसेंबरदरम्यान नाताळ सण खामगावात आनंदाने साजरा होणार आहे. खामगाव शहरात ख्रिस्ती नागरिकांची संख्या मोठी आहे. प्रभू येशूचा जन्म गोठ्यात झाला होता. जन्माचा देखावा आणि त्या काळाची प्रतिकृती म्हणून नाताळ गोठे बनविण्यात येतात. यामध्ये सर्वसाधारणपणे बेथलेम गावाची पार्श्वभूमी, डोंगर, नद्या, गवताळ परिसर तसेच लाकडी गोठा, मध्यभागी बाळ म्हणजेच येशू आणि डोक्यावर रंगवण्यात आलेला तारा, एका बाजूला मेरी तर दुसऱ्या बाजूला जोसेफ, कोपऱ्यात बसलेली गाय, आपल्या मेंढरांसोबत गोठ्याजवळ उभे असलेले मेंढपाळ आणि भेटवस्तू घेऊन आलेले तीन राजे साकारले जातात. यासोबतच आकर्षक रोषणाई करण्यात येत आहे. बेथेल अलायन्स चर्चसह विविध कार्यक्रमाचे आयोजनही केले आहे.

## अपघातग्रस्त कार पेटून एक भाजला चौघे जखमी!

जनसंचलन/खामगाव

कारचे टायर फुटल्याने कार चालकाचे नियंत्रण सुटले आणि कार डिव्हायडवर धडकल्याने त्याची पेट्रोल टाकी फुटली त्यामुळे कार मध्ये आग लागल्याची घटना आज दिनांक २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ४:३० वाजे दरम्यान घडली. या अपघातात एकाचा कारमध्येमच जळून कोळसा झाला. तर परिसरातील नागरीकांनी धाव घेत कारमधील चौघांना बाहेर काढून त्यांचे प्राण वाचविले. ही घटना बुलढाणा जिल्ह्यातुन जाणाऱ्या नागपूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर खामगाव जवळच्या हॉटेल सुदर्शन नजीक घडली आहे. या बाबत प्राप्त माहिती अशी की,अमरावती येथून खामगावमार्गे उज्जैनला दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकाची कार क्रमांक एमएच २४ एडब्ल्यू ७९०४ हि खामगाव जवळ मार्गावरील हॉटेल सुदर्शन समोरून जात असतांना अचानक कारचा टायर फुटल्याने सदर कार डिव्हायडरवर जावून आदळली. यात कारच्या पेट्रोल टाकीचा भडका झाला आणि कारने पेट घेतला.यावेळी परिसरातील नागरीकांनी धावपळ करत आग विझविण्याचा प्रयत्न केला व कारमधील महिलांसह चौघांना बाहेर काढून त्यांचे प्राण वाचविण्यात यश मिळविले. परंतु कारमधील एकाचा जागीच जळून कोळसा झाल्याने त्याचा मृत्यू झाला. मृतकाचे नाव अरूण बाबूराव चिंचणसुरे वय ७२ वर्ष रा. लातुर असे आहे.तर परूत अरुण चिंचणसुरे (३६), आशिष अरुण चिंचणसुरे (३२), लक्ष्मी अरुण चिंचणसुरे (६१), शारदा पुणे (५५) सर्व रा. लातूर हे जखमी झाले आहे. जखमींना तातडीने खामगाव शहरातील



खाजगी दवाखान्यात उपचारासाठी भरती करण्यात आले आहे. महादेव फंड बनला देवदूत कारचा अपघात झाल्याने सुदर्शन हॉटेल जवळ असलेले महादेव फंड रा. सतीफैल यांनी क्षणाचा विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. यावेळी कारने पेट घेतला होता. महादेव फंड यांने समयसुचकता दाखवून कारच्या खिडकीचे काच फोडून कारमधील दोघांना नागरीकांच्या साहाय्याने ओढून बाहेर काढले व त्यांचे प्राण वाचविले. त्याच्या या धाडसी कार्याबद्दल सर्वजन कौतुक करीत आहेत.

# हिवाळी अधिवेशनात १७ विधेयके मंजूर...

## विदर्भ-मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाच्या लेखाजोख्यासह

## समतोल, सर्वांगिण, विकसित महाराष्ट्राचा आराखडा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वृत्तसंस्था/नागपूर

नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात विदर्भ-मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांसह सिंचन, उद्योग, नदीजोड प्रकल्प, पायाभूत सुविधांसारख्या क्षेत्रांबाबत घेण्यात आलेल्या निर्णयांचा लेखाजोखा आणि विकसित, समतोल, सर्वांगिण महाराष्ट्राचा आराखडा मांडण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या अधिवेशनात विविधांगी चर्चेच्या माध्यमातून १७ विधेयके मंजूर करण्यात आली असून जनसुरक्षा विधेयकाबाबत सर्वांना आपले म्हणणे मांडता येण्यासाठी हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर नागपूरच्या विधिमंडळ परिसरातील हिरवळीवर मुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकार परिषद झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आमच्या सरकारने विदर्भ-मराठवाड्याच्या विकासासह शेतकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. या अधिवेशनात मांडलेल्या ३५ हजार ७८८ कोटींच्या पुरवण्या मागण्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यासारख्या योजना यापुढेही सुरु ठेवण्यासाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आपत्ती बाधीत ५५ हजार संत्रा शेतकऱ्यांना १६५ कोटी रुपये मदत देण्यात आली आहे. कापसाला बोनस देण्यात आला आहे. सोयाबीनची विक्रमी खरेदी करण्यात आली असून १२ जानेवारीपर्यंत ही खरेदी सुरु राहणार आहे. बाजारात कापूस आणि तुरीचे खरेदी दर जास्त असल्याने शेतकरी आपला माल बाजारात विकत आहेत. विविध माध्यमांतून पिकांना सहाय्य करण्यासह शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम सरकार करत असल्याचेही त्यांनी सांगितले. नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी आशियाई विकास बँकेबरोबर प्रकल्प करार करण्यात आला आहे. या प्रकल्पाला ०.७२ टक्के व्याजदराने २० वर्षांसाठी ३५८६ कोटी रुपये अर्थसहाय्य मिळणार आहे. ह्रमित्राफ संस्थेच्या माध्यमातून एक हजार लोकसंख्येवरील गावांना काँक्रीट रस्त्याने जोडणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे बळकटीकरण, बांबू अभियान यासारख्या उपक्रमांना देखील आशियाई विकास बँक मदत करणार आहे, अशी माहितीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, गेल्या अडीच वर्षात सर्वासामान्य माणसांच्या आयुष्यात बदल घडविणारे अनेक निर्णय घेतले आहेत.



आता आमची जबाबदारी आणखी वाढली असून सर्वसामान्यांच्या-मायभगिनींच्या प्रगतीसाठी, रक्षणासाठी यापुढेही एक टीम म्हणून काम केले जाणार आहे. या अधिवेशनात नागरिकांच्या, राज्याच्या चौफेर विकासाचा संकल्प करण्यात आल्याने हे अधिवेशन यशस्वी झाले आहे. या परिषदेस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री शंभूराज देसाई, संजय राठोड, आशिष जयस्वाल, नितेश राणे आदी उपस्थित होते.

---

# रास्ता रोको स्वाभिमानीच्या १६ जणांविरोधात गुन्हा दाखल

जनसंचलन/ खामगाव

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने गुरुवारी टेंभुर्णा फाट्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांच्या जमावबंदी आणि पोलिसांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या १६ जणांविरोधात ग्रामीण पोलिसांनी विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष अमोल पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रास्तारोको आंदोलन केले. आंदोलन करताना जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्या जमाव बंदी आदेशाचे उन्नघन केले, तसेच पोलिस निरीक्षक यांनी कलम १६८ नोटीस बजावण्यात आल्यानंतरही आंदोलन केल्याचे पोकॉ. नितेश राठोड यांनी नमूद केले. या तक्रारीवरून अमोल पाटील, शरद पवार (३५) रा. संभापूर, अमरदीप तावडे (३९) रा. हिंगणा उमरा, अंकित धोंगे (२३) रा. हिंगणा उमरा, शेख आतीक शेख कदीर (५०) रा. चितोडा, कपिलसिंग पवार (३७) रा. संभापूर, आकाश जुमळे (४०) रा. हिंगणा, योगेश भोंगे (३९) रा. हिंगणा, परमेश्वर जुमळे, गोपाल जुमळे, आकाश धोंगे, पंकज घोंगे, गणेश नागे, शंकर जुमळे, अनंता घोंगे यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम २२३, महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल केला.


# वडगाव गड जिल्हा परिषद शाळेत आनंदमेळा उत्साहात

जनसंचलन/ वडगाव

येथील जि. प. मराठी उच्च माध्यमिक शाळेत शनिवारी प्रांगणात बाल आनंद मेळावा पडला. पार मेळाव्याचे उद्घाटन गटविकास अधिकारी संदीप मोरे यांच्याहस्ते पार पडले. यावेळी शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी मोरे यांनी शालेय जीवनापासून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी बालपणापासून स्वतः कमविण्यासाठीचा अनुभव आठवण म्हणून नेहमी राहतो, असे सांगितले. त्याचप्रमाणे शाळेत सीसी कॅमेरे किंवा ग्रामपंचायतीच्या निधीतून बसवण्यात यावे, अशी मागणी यावेळी पालकांनी केली. कार्यक्रमा अतिथी म्हणून केंद्रप्रमुख कुवारे, संजय वाकोडे, ढोले, सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच आणि सर्व सदस्य तसेच सर्व माजी शाळा समिती अध्यक्ष गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक उपस्थित होते. जवळपास १०० स्टॉल उभारून विद्यार्थ्यांनी मेळाव्याची शोभा वाढविली. मेळाव्यात विद्यार्थ्यांनी घरून आणलेले साहित्य विक्रीतून मिळालेल्या पैशाचा विशेष आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत








दैनिक निडर निर्भिड जनसंचलन — आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन — ===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क ===== संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958